**नि.दि.दा. क्र.१९/२०२१.**
**नि.क्र.५३**

**प्रतिवादी क्र.१ ते ४ तर्फे उलटतपास विद्वान वकील श्री. बी.पी. वर्मा यांचेमार्फतः-**

**२५.** हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिलांनी दावा मिळकत गट नंबर ९०/१ मधील २० आर जमिन प्रत्येकी दोन खरेदीखतानुसार वेगवेगळ्या वेळेस श्री. मारकळी यांना विक्री केली. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१३ मध्ये २० आर जमिन श्री. मारकळी यांना विक्री केली त्यावेळेस त्याचे क्षेत्रफळ १५० x १५० असे होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल व अजित मंडलिक यांच्यामध्ये दस्त क्र.२९७४/१६ नुसार दावा मिळकत ९०/१ च्या अनुषंगाने चुक दुरुस्तीचा दस्त झालेला होता. मला आता यादी निशाणी क्र.६१/१ वरील चुक दुस्तीचा दस्त दाखवण्यात आला, तो माझे वडिल व अजित मंडलिक यांच्यामध्ये झाला होता, त्यावर त्यांचे फोटो आहेत. तो दस्त बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.६२** देण्यात आला.

**२६.** दत्तात्रय फुलसोंदर हे माझ्या वडिलांचे मावस भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांनी माझ्या हक्कात जे बक्षिसपत्र करुन दिलेले आहे त्यावर देखील दत्तात्रय फुलसोंदर हे साक्षीदार आहेत. दस्त क्र.२३७/२०१६ वरील खरेदीखतातील मजकुर मला मान्य नाही. सदर दावा दाखल करण्यापुर्वी माझी दत्तात्रय फुलसोंदर यांच्यासोबत चर्चा झालेली नव्हती. माझे वडिलांना दारुचे व्यसन होते याबाबत माझ्या तोंडी पुराव्यातिरीक्त इतर पुरावा माझ्याकडे नाही. मी प्रतिवादी नं.५ ते १६ यांना मोजणी करणेकामी कुठल्या तारखेस संमती मागितली होती ती तारीख आता मला आठवत नाही. प्रतिवादी नं.५ ते १६ यांच्याकडे अतिक्रमण निघालेले नाही. त्यांच्याविरुध्द माझी कुठलीही मागणी नाही. दावा मिळकत गट नंबर ९०/१ मध्ये प्रतिवादी नं.१ भारत यांची जी ४ आर जमिन आहे त्यावर त्यांनी बांधकाम केलेले आहे व तेथे कापड दुकानाचा व्यवसाय चालु आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा

मिळकत गट नंबर ९०/१ मध्ये प्रतिवादी नं.३ गुरुनाम यांची जी ७ आर जमिन आहे त्यावर त्यांनी बांधकाम केलेले आहे व तेथे कापड दुकानाचा व्यवसाय चालु आहे. हे मला माहित नाही की, दावा मिळकत गट नंबर ९०/१ मध्ये प्रतिवादी नं.२ गायत्री हिची ४ आर जमिन मोकळी आहे. हे मला माहित नाही की, दावा मिळकत गट नंबर ९०/१ मध्ये प्रतिवादी नं.४ नितीन यांची ६ आर जमिन मोकळी आहे. हे म्हणणे खरे नाही की, चुकदुरुस्तीच्या दस्ताबाबत मला संपुर्ण माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीकडून पैसे काढण्याकरीता मी सदरचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत गट नंबर ९०/१ मध्ये प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी जी २१ आर जमिन खरेदी केलेली आहे ती त्यांच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

SUNIL NAGORAO BHOSLE

Digitally signed by SUNIL NAGORAO BHOSLE
Date: 2025.03.13 12:43:33 +0530

दिनांक – १२/०३/२०२५

**(एस.एन. भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
नेवासा